जा.क्र.वि.शा./निवडणूक/१०४५६/२०१७
पोलीस उप आयुक्त विशेष शाखा-०१
पुणे शहर यांचे कार्यालय
दिनांक :- २१/१२/२०१७

<u>विषय</u> :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे**
मतदान केंद्राचे १०० मीटरचे परिक्षेत्रातील व्यावसायिक दुकाने व आस्थापना बंद ठेवणेबाबत आदेश.

**<u>आदेश</u>**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.२१/का-८ दि.१७/११/२०१७ च्या आदेशान्वये माहे जानेवारी-फेब्रुवारी-२०१८ या कालावधीत मुदती संपणा-या पुणे जिल्हयातील ९९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील भारती विदयापीठ पोलीस स्टेशन मधील भिलारेवाडी, गुजर निंबाळकर वाडी, जांभुळवाडी-कोळवाडी, मांगडेवाडी ता, हवेली जि. पुणे या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. दिनांक २६/१२/२०१७ रोजी मतदान होणार आहे. व दिनांक २७/१२/२०१७ रोजी मतमोजणी होणार आहे

मतदान सुरळीत व शांततेत पार पडण्यासाठी दिनांक २६/१२/२०१७ रोजी उपरोक्त नमुद केलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी मतदान केंद्राचे परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरामध्ये मतदानाच्या दिवशी सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये व सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सदर परिसराचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्रांचे १०० मिटर परिसरात निर्बंध घालणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी, **रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर** या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील अधिकारान्वये पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील भारती विदयापीठ पोलीस स्टेशन मधील भिलारेवाडी, गुजर निंबाळकर वाडी, जांभुळवाडी-कोळवाडी, मांगडेवाडी ता, हवेली जि. पुणे या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी ०५ मतदान केंद्रे (इमारती) व १३ बुथवर १०० मीटर सभोवतालच्या परिसरामध्ये दिनांक २६/१२/२०१७ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**१)** ०५ मतदान केंद्राच्या (इमारतीच्या) परिघापासुन १०० मीटर सभोवतालच्या परिसराचे आतील सर्व व्यावसायिक, व्यावसायिक दूकाने, रेस्टॉरन्ट, टप-या, वाणिज्यिक आस्थापना (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना व तत्सम बाबी बंद ठेवाव्यात.

सदरचा आदेशाची उल्लंघन करणारी व्यक्ती भा.द.सं.कलम १८८ मधील तरतुदीनूसार कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व शिक्कयानिशी आज दिनांक २१/१२/२०१७ रोजी देणेत आला आहे.

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- २१/१२/२०१७**

**(रविंद्र कदम)**
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर